शैक्षणिक वर्ष 2022-23

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय जालना

## राज्यशास्त्र विभाग

## स्थळ भेटीचा अहवाल

नवीन शैक्षणिक धोरण 2020 (New Education Policy) नुसार विद्यार्थ्यांना अनुभवजन्य व कौशल्यजन्य शिक्षण मिळावे, या दृष्टीकोणातून राज्यशास्त्र विभागाच्या वतीने ग्राम पंचायत कार्यालय इंदेवाडी ता. जि. जालना येथे ' ग्राम पंचायत प्रशासन व वित्तीय कारभार ' या विषयावर आधारित स्थळ भेट (Field Visit) चे आयोजन दि. 12 नोव्हेंबर 2022 रोजी दु. 12.30 वा. करण्यात आले होते. या स्थळ भेटीमध्ये विद्यार्थ्यांना पंचायत राज व्यवस्थेमध्ये ग्राम पंचायतीचे असलेले अनन्य साधारण महत्व, गावच्या विकासात ग्राम पंचायतीचे असलेले योगदान, सरपंच निवड पद्धत, ग्राम सभेला असलेला संवैधानिक दर्जा, ग्राम सेवकाचे स्थान इ. बाबत प्रत्यक्ष स्थळावर जाऊन मार्गदर्शन करण्यात आले.

या अभ्यास दौऱ्याचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांच्या संमतीने राज्यशास्त्र विभागाचे प्रा. सचिन जयस्वाल यांनी केले होते. यावेळी त्यांनी उपस्थितांना भारतीय राज्य व्यवस्थेत ग्राम पंचायतीचे महत्व विषद केले. सामाजिक शास्त्रांचा अभ्यास विषय मानव हा असल्याने मानवी वर्तनुकीचा सखोल अभ्यास हा समाजात जाऊनच केल्या जाऊ शकतो, असे म्हटले. त्यामुळे आता सामाजिक शास्त्राच्या विद्यार्थ्यांनी यापुढे विविध सार्वजनिक स्थळे, बाजार व्यवस्था, ग्राम पंचायती इ. ठिकाणी अभ्यास भेटी दिल्यास आपल्याला विविध सामाजिक समस्या समजू शकतात. या स्थळ भेटीत इंदेवाडी ग्राम पंचायत चे कर्मचारी श्री. अक्षय उघडे साहेब यांनी गावचा इतिहास, वित्तीय तरतुदी इ. ची सखोल माहिती दिली.

या अभ्यास भेटीत प्रा. डॉ. प्रमोद चव्हाण, प्रा. षाजी सहदेवन, कु. निशिगंधा सूर्यनारायण, कु. रमिजा शेख, सूरज म्हस्के, वैशाली दंडगे इ. विद्यार्थी उपस्थित होते.

प्रा. सचिन जयस्वाल
राज्यशास्त्र विभाग

प्राचार्य
डॉ. सुनंदा तिडके

REG NO. ६१७ Phone No.२२३११८

Bhagwan Shikshan Prasarak Mandal Georai

# Rashtramata Indira Gandhi Arts, Commerce & Science College,Old Jalna.

| Principal | e-mail | President |
|---|---|---|
| Dr. S.V. Tidke | rmigjalna@gmail.com | Dr.Narayanrao Mundhe |


Ref. RMIG /Jalna/2022-23/ Date:- 11/11 /2022

प्रति,

माननीय सरपंच

ग्राम पंचायत कार्यालय, इंदेवाडी

ता. जि. जालना

विषय – विद्यार्थी अभ्यास भेट ( StudyTour ) बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास विनंती करण्यात येते की, आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ग्राम प्रशासन व वित्तीय कारभार या विषयी अधिक माहिती व्हावी या उद्देशाने आपल्या ग्राम पंचायत कार्यालय इंदेवाडी येथे दिनांक 12 नोव्हेंबर 2022 रोजी ठीक 12.00 वा. अभ्यास सहल ( StudyTour ) चे आयोजन केले आहे. तरी आपण सहकार्य करावे. ही विनंती.

O/C

सरपंच
ग्रामपंचायत इंदेवाडी
ता.जि.जालना

प्राचार्य
PRINCIPAL
Rashtramata Indira Gandhi Arts, Science & Commerce College

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय जालना

## राज्यशास्त्र विभाग, लोक प्रशासन विभाग, अर्थशास्त्र विभाग

## सूचना

दिनांक 11 / 11 / 2022

महाविद्यालयातील राज्यशास्त्र, लोक प्रशासन, अर्थशास्त्र विभागातील सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, दिनांक 12 नोव्हेंबर 2022 रोजी ग्रामपंचायत कार्यालय इंदेवाडी ता. जि. जालना येथे 'ग्राम पंचायत प्रशासन व वित्तीय कारभार' या विषयी अभ्यास भेट Study Tour चे आयोजन केले आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी सकाळी 10.00 वा. महाविद्यालयात उपस्थित राहावे.

प्राचार्य

PRINCIPAL

Rashtramata Indira Gandhi Arts Science & Commerce College Jalna.

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय जालना

## राज्यशास्त्र विभाग

## Field Visit ( स्थळ भेट )

विषय – ग्राम पंचायत प्रशासन व वित्तीय कारभार

स्थळ – ग्राम पंचायत कार्यालय इंदेवाडी ता. जि. जालना

दिनांक – 12 / 11 / 2022   वेळ- दु. 12.30 वा.

आयोजक


प्रा.सचिन जयस्वाल    प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके

भेटीसाठी उपस्थित विद्यार्थ्यांच्या सह्या

| अ. क्रं° | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग | सही |
|---|---|---|---|
| 1) | साक्षी मोहन पवार | fy B.A B.A | Sakshi |
| 2) | रोहिणी उत्तम होलबोले | B.A. fy | Rohini |
| 3) | निशिगंधा सूर्यनारायण | B.A. III | [illegible] |
| 4) | पूजा संतोष सोनवणे | B.A. II | Pooja |
| 5) | विशाखा देवीदास दांडगे | B.A. III | Dandge |
| 6) | शेख अलमास शेख नासीर | B.A. I | [illegible] |
| 7) | आसेमा मोहम्मद परसूवाले | B.A. I | Asema |
| 8) | मयुरी राजेंद्र आगलावे | B.A I | Myuri |
| (9) | श्वेता रामराव हरते पिंपळगावकर | B.A I | Shweta |
| (10) | गायत्री दिपक गोरखोले | B.A. I | Gayatri |

| | | | |
|---|---|---|---|
| 11) | सविता आबासाहेब थोरात | B.A.I | Lata |
| 12) | स्नेहल गोरक्षा देठे | B.A.II | [illegible] |
| 13) | मनिषा सोपान शिरसाठे | B.A.I | [illegible] |
| 14] | शितल सतिष मगर | BA I | Shital |
| 15 | नम्रता सखाराम रोटे | BA I | Rote |
| 16] | वाघमारे प्रिया शिवनाथ | B A III | Priya |
| 17) | गायके पंचशिला हसन | B.A III | [illegible] |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |


ग्राम पंचायत कार्यालय, इंदेवाडी


Rashtramata Indira Gandhi College, Jalna
Jalna, Maharashtra, India
RV38+H8Q, Swaraj Rd, Indewadi, Jalna, Maharashtra 431213, India
Lat 19.803905°
Long 75.866466°
12/11/22 01:02 PM
GPS Map Camera


आमचा विकास
DEPARTMEN



अभियान
आमचा विकास
DEPARTMENT OF
POLITICAL SCIENCE
Principal

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय जालना

## राज्यशास्त्र विभाग

## विनंती अर्ज

प्रति, दि. 23/05/2022

प्राचार्य,

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय जालना

विषय – राज्यशास्त्र विषयाच्या प्रकल्प अहवालास (Field Work) परवानगी मिळणेबाबत.

महोदय,

वरील विषयास अनुसरून सविनय अर्ज सादर करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2021–22 साठी राज्यशास्त्र विभागाद्वारे **'डोंगरगाव ता. बदनापूर जि. जालना या गावच्या विकासात डोंगरगाव ग्रामपंचायतीचे योगदान'** या विषयावर प्रकल्प अहवाल (Field Work) तयार करण्याचे ठरविले आहे. तरी आपण आमच्या या प्रकल्प अहवालास परवानगी द्यावी ही विनंती.

आपला विश्वासू

प्रा. सचिन जयस्वाल

राज्यशास्त्र विभाग

प्राचार्य

डॉ. सुनंदा तिडके

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय जालना

## राज्यशास्त्र विभाग

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सदरील '**डोंगरगाव ता. बदनापूर जि. जालना या गावच्या विकासात डोंगरगाव ग्रामपंचायतीचे योगदान**' या विषयावरील प्रकल्प अहवाल आमच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेला आहे. व त्यासाठी हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

स्थळ : जालना

दिनांक : 23-05-2022

प्रा. सचिन जयस्वाल
राज्यशास्त्र विभाग

प्राचार्य
डॉ. सुनंदा तिडके

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय जालना

राज्यशास्त्र विभाग

शैक्षणिक वर्ष : 2021-22

प्रकल्प अहवाल : **'डोंगरगाव ता. बदनापूर जि. जालना या गावच्या विकासात डोंगरगाव ग्रामपंचायतीचे योगदान'**

**सादरकर्ते : श्री. स्वप्नील सिनगारे व इतर विध्यार्थी**

मार्गदर्शक

**प्रा. सचिन जयस्वाल**
**राज्यशास्त्र विभाग**

**प्राचार्य**
**डॉ. सुनंदा तिडके**

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय जालना

## राज्यशास्त्र विभाग

## शैक्षणिक वर्ष : 2021-22

प्रकल्प अहवाल : **'डोंगरगाव ता. बदनापूर जि. जालना या गावच्या विकासात डोंगरगाव ग्रामपंचायतीचे योगदान'**

**सादरकर्ते : श्री. स्वप्नील सिनगारे व इतर विध्यार्थी**

मार्गदर्शक

**प्रा. सचिन जयस्वाल**

**राज्यशास्त्र विभाग**

**प्राचार्य**

PRINCIPAL

**डॉ. सुनंदा तिडके**

Science & Commerce

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय जालना

## राज्यशास्त्र विभाग

प्रकल्प अहवाल :

**डोंगरगाव ता. बदनापूर जि. जालना या गावच्या विकासात डोंगरगाव ग्रामपंचायतीचे योगदान**

अहवालात सहभागी विध्यार्थी दि. 23/05/2022

| अ. क्र. | विध्यार्थी नाव | वर्ग | सह्या |
|---|---|---|---|
| 1) | स्वप्निल लक्ष्मण शिनगारे | B.A. III | [signature] |
| 2) | तुळशीराम रामदास आटोळे | B.A. III | [signature] |
| 3) | शुभम सुधाकर गारदे | B.A. III | [signature] |
| 4) | कु. अंजली राहुल घुगे | B.A. III | [signature] |
| 5) | रघुवीर लखान गुडे | B.A. III | [signature] |
| 6) | आनंद काकासाहेब खरात | B.A. III | [signature] |
| 7) | सेवक गणेश पाटोळे | B.A. III | [signature] |
| 8) | अर्जुन मुरलीधर शिंदे | B.A. III | Shinde |
| 9) | माधुरी दादाराव वाहुळकर | B.A. III | [signature] |

[signature]

प्रा. सचिन जयस्वाल

राज्यशास्त्र विभाग

[signature]

प्राचार्य

डॉ. सुनंदा तिडके

# राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय जालना

## राज्यशास्त्र विभाग

## विनंती अर्ज

प्रति, दि.23/05/2022

प्राचार्य,

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय जालना

विषय – राज्यशास्त्र विषयाच्या प्रकल्प अहवालास (Field Work) परवानगी मिळणेबाबत.

महोदय,

वरील विषयास अनुसरून सविनय अर्ज सादर करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2021–22 साठी राज्यशास्त्र विभागाद्वारे **'डोंगरगाव ता. बदनापूर जि. जालना या गावच्या विकासात डोंगरगाव ग्रामपंचायतीचे योगदान'** या विषयावर प्रकल्प अहवाल (Field Work) तयार करण्याचे ठरविले आहे. तरी आपण आमच्या या प्रकल्प अहवालास परवानगी द्यावी ही विनंती.

आपला विश्वासू

प्रा. सचिन जयस्वाल

राज्यशास्त्र विभाग

प्राचार्य 23-05-2022

डॉ. सुनंदा शिंदे

PRINCIPAL

Rashtramata Indira Gandhi Arts Science & Commerce College, Jalna

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय जालना

## राज्यशास्त्र विभाग

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सदरील **'डोंगरगाव ता. बदनापूर जि. जालना या गावच्या विकासात डोंगरगाव ग्रामपंचायतीचे योगदान'** या विषयावरील प्रकल्प अहवाल आमच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेला आहे. व त्यासाठी हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

स्थळ : जालना

दिनांक : 23-05-2022

प्रा. सचिन जयस्वाल
राज्यशास्त्र विभाग

प्राचार्य
डॉ. सुनंदा तिडके

PRINCIPAL
Rashtramata Indira Gandhi Arts
Science & Commerce College, Jalna

## अनुक्रमणिका



| अ.क्र. | विषय |
|---|---|
| 01 | प्रस्तावना |
| 02 | महाराष्ट्रातील पंचायतराज |
| 03 | पंचायतराज निवडणूक |
| 04 | सरपंच व उपसरपंच |
| 05 | ग्रामपंचायत व ग्रामसभा |
| 06 | ग्रामपंचायत सचिव |
| 07 | ग्रामपंचायतीकडील कामाचे विषय |
| 08 | डोंगरगाव ग्रामपंचायतीचे योगदान |
| | - कृषी |
| | - पशुसंवर्धन |
| | - वने |
| | - शिक्षण |
| | - वैद्यकीय सेवा |
| | - दळणवळण |
| | - स्वच्छता |

## ★ प्रस्तावना ★

डोंगरगाव हे जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील छोट्याशा लोकवस्तीचे गाव आहे. गावाला स्वतःची परंपरा, व ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. गावाच्या दक्षिणेला एक छोटासा डोंगर आहे. त्यावरून गावाचे नाव डोंगरगाव पडले असे मानले जाते. गावाच्या पूर्वेकडून गोदावरीची प्रमुख उपनदी असणारी दुधना नदी वाहते. नदी व डोंगराने वेढलेले सुंदर असे गाव आहे.

जालन्यापासून डोंगरगावचे अंतर 19 किमी आहे. तर तालुका बदनापूरचे अंतर 14 KM आहे. गावाचा कोड 547765 आहे. गावाचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ 326.65 हेक्टर एवढे आहे. एकूण क्षेत्रफळापैकी 90%. क्षेत्रावर शेती केली जाते. शेतीही ~~प्रकार~~ मुख्यत्वे कोरडवाहू आहे. कापूस हे मुख्य पीक असून गहू, ज्वारी, बाजरी ही धान्यपीके तूर, हरभरा ही कडधान्ये पीके ~~तर~~ त्यासोबतच मोसंबी व डाळिंब ही फळपीके ही घेतली जातात. गावातील निम्मी जनता ही शेतीवर अवलंबून आहे. शेतीसोबतच शेळीपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन हे पूरक व्यवसायही केले जातात. तरुण मुले ही जालना येथे असणाऱ्या स्टील कंपन्यांमध्ये कामगार म्हणून काम करतात.

2011 च्या जनगणनेनुसार. गावाची एकूण लोकसंख्या ~~एक~~ 957 एवढी आहे. त्यामध्ये 504 पुरुष तर 453 महिला लोकसंख्या आहे. गावात 124 च्या जवळपास घरे आहेत. पुरुष लोकसंख्या शेती कामे करतात. तर महिला शेतीकामात मदत व गृहिणी आहेत. गावातील काही महिला या बचत गटा-अंतर्गत पापड, शेवया तयार करण्याचा कुटीरोद्योग चालवतात. त्यांना मशिन व तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी बचत गटाकडून कमी व्याजाने कर्ज मिळते.




ग्रामपंचायत - डोंगरगांव

| जनगणना मानके | माहिती |
|---|---|
| एकूण लोकसंख्या | 957 |
| पुरुष लोकसंख्या | 504 |
| महिला लोकसंख्या | 453 |
| पुरुष लोकसंख्या (%) | 52.7% |
| महिला लोकसंख्या (%) | 47.3% |
| महिला साक्षरता दर | 21.4% |
| पुरुष साक्षरता दर | 78.6% |
| अ. जमाती लोकसंख्या (%) | 8.3% (79) |
| अ. जाती लोकसंख्या | 5.7% (55) |
| बालकांची संख्या | 157 |

डोंगरगावची लोकसंख्या घनता ही 158/km² एवढी आहे. गावातील लोक हे दररोजच्या महत्वपूर्ण गरजांसाठी जवळच्या जिल्ह्यावर अवलंबून असतात. गावाला स्वतःचे पोस्ट ऑफीस नसून ते लाखगाव या जवळच्या गावी आहे. गावात एक जिल्हापरिषद शाळा आहे. तिथे गावातील पहिली ते चौथी या वर्गातील मुले शिक्षण घेतात. गावामध्ये पाचवी ते 10 वी शिक्षणासाठी आदर्श विद्यालय आहे. येथे गावातील तसेच साखगाव, कुडेगाव, पिंपळगाव, कुंभारी, सिरसवाडी या गावांवरून मुले शिक्षणासाठी येतात.

गावातील डोंगरावर पावनधाम आश्रम आहे. जिथे गोशाळा व त्यासोबतच विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाचे विद्यार्जन केले जाते. येथे दरवर्षी संत ज्ञानेश्वर समाधी सोहळा पार पडतो व लाखो भाविक भजन-कीर्तन ऐकण्यासाठी येतात.



नवीन ग्रामपंचायत इमारत

Page Date

## * महाराष्ट्रातील पंचायतराज *

महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीचा कारभार 'महाराष्ट्र ग्रामपंचायत कायदा 1958' नुसार चालतो. (कलम 5). नवीन ग्रामपंचायत स्थापन करण्याचा अधिकार विभागीय आयुक्तांना असतो.

ग्रामपंचायत रचना


| गावाची लोकसंख्या | सदस्य संख्या |
|---|---|
| 1500 किंवा कमी | 7 |
| 1501 ते 3000 | 9 |
| 3001 ते 4500 | 11 |
| 4501 ते 6000 | 13 |
| 6001 ते 7500 | 15 |
| 7501 ते त्यापेक्षा जास्त | 17 |

डोंगरगावची ग्रामपंचायत ही 7 सदस्यीय असून सरपंचाची निवड ही जनतेतून झाली आहे.

ग्रामपंचायत सदस्य

| | |
|---|---|
| विष्णु धनधाव | सरपंच |
| मुक्ता बिनगारे | उपसरपंच |
| निर्मला धनधाव | सदस्य |
| अहिल्या धनधाव | —॥— |
| रहिबाई पिनळे | —॥— |
| भास्कर धनधाव | —॥— |

गावातील ग्रामपंचायतीमध्ये महिला सदस्यांची संख्या जास्त आहे. ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक म्हणून नाथ मॅडम यांची कुळतीय नियुक्ती झाली आहे.



स्वस्त धान्य दुकान - डोंगरगाव

# ✱ पंचायतराज ✱

छोट्या खेडगावाचा कारभार ग्रामपंचायत नावाची स्थानिक स्वराज्य संस्था पाहते. सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक यांच्या मदतीने हा कारभार पाहिला जातो. पंचायतराजमधील सर्वात खालच्या पण महत्वाच्या स्थानाला ग्रामपंचायत म्हणतात. संविधानाच्या भाग 4 (राज्य धोरणाची निर्देशक तत्वे) मधील अनुच्छेद 40 मध्ये ग्रामपंचायतींचे संघटन करावे अशी कलम आहे.

लोकशाहीच्या विकेंद्रीकरणाच्या हेतूने 1992 मध्ये 73 वी घटनादुरुस्ती करुन पंचायतींचा समावेश संविधानात करण्यात आला. 73 व्या घटनादुरुस्ती कायद्याने संविधानामध्ये पुढील बाबींचा समावेश करण्यात आला.

1) कलम 243, 243-A ते 243-O (भाग - 9) - पंचायती

2) अनुसूची 11

73 व्या घटनादुरुस्तीने पंचायतराजला संविधानात्मक दर्जा प्राप्त झाला. 73 व्या घटनादुरुस्तीची अंमलबजावणी 24 एप्रिल 1993 पासून झाली.

पंचायतराज संबंधी केंद्राने नेमलेल्या समित्या :

| समिती | स्थापना | अहवाल |
|---|---|---|
| बलवंतराय मेहता समिती | 16 जाने 1957 | 27 नोव्हे 1957 |
| व्ही. टी. कृष्णमाचारी | 1960 | 1962 |
| अशोक मेहता समिती | 12 डिसेंबर 1977 | ऑगस्ट 1978 |
| जी. व्ही. के राव समिती | 1985 | - |
| डॉ. एल. एम. सिंघवी | 1986 | - |
| पी. के. थुंगन समिती | 1988 | - |



अंगणवाडी - डोंगरगाव

Page | Date

## * निवडणूक *

ग्रामपंचायतीच्या मतदारसंघांना 'प्रभाग' म्हणतात. प्रभागांची संख्या जिल्हाधिकारी निश्चित करतात. तहसीलदार प्रभाग रचना तयार करून प्रसिद्ध करतात. प्रत्येक प्रभागातून निवडावयाच्या सदस्यांची संख्या किमान 2 ते कमाल 3 इतकी असते. ग्रामपंचायतीचा कालावधी हा 5 वर्षांचा असतो. निवडणूकीत मतदान हे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे करण्यात येईल. ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत राजकीय पक्षांना सहभागी होता येत नाही.

निवडून येण्यास पात्रता :


1) नामनिर्देशन भरण्याच्या अंतिम दिनांकास वय 21 वर्षे असावे.
2) ग्रामपंचायतीच्या मतदारयादीत नाव असावे.
3) कायद्यान्वये निवडणूक लढविण्यास ती व्यक्ती अपात्र नसावी.

ग्रामपंचायत सदस्यांच्या पदावधी :

ग्रामपंचायत सदस्यांचा पदावधी ~~5~~ 5 वर्ष इतका असतो. ग्रामपंचायत मुदतपूर्व विसर्जित झाल्यानंतर निवडून आलेले ग्रामपंचायत सदस्य ज्यांच्या जागेवर निवडून आले आहेत त्यांच्या उर्वरित कालावधी करिता पदावर राहतात. ग्रामपंचायतीच्या एखाद्या सदस्याचे पद रिक्त झाल्यानंतर उर्वरित कालावधी 6 महिन्यांपेक्षा कमी असल्यास ते रिक्त पद भरले जात नाही. ग्रामपंचायतीच्या विसर्जनाच्या तारखेपासून 6 महिन्यांच्या आत पहिली सभा घेतली जाते.

आरक्षण :

| प्रवर्ग | संविधानातील आरक्षण | महाराष्ट्रातील आरक्षण |
|---|---|---|
| SC | लोकसंख्येच्या प्रमाणात | लोकसंख्येच्या प्रमाणात |
| ST | लोकसंख्येच्या प्रमाणात | लोकसंख्येच्या प्रमाणात |
| OBC | राज्य शासनाने ठरवावे | 27% |
| महिला | किमान 33% | 50% |



जिल्हा परिषद शाळा -कोंगरगाव

## सरपंच व उपसरपंच

राज्यातील सरपंचपदामध्ये SC, ST, OBC या प्रवर्गाकरिता आणि महिला यांच्याकरिता राखीव जागा ~~असतील~~ असतील. राखीव जागा वेगवेगळ्या पंचायतींना आळीपाळीने नेमून देण्यात येतील. राज्यातील सरपंच पदामध्ये OBC प्रवर्गाकरिता 27% पदे राखीव ठेवली जातील. त्यातील किमान 50% पदे OBC महिलांकरिता राखीव ठेवली जातात. उपसरपंच पदाकरिता आरक्षणाची तरतूद नाही. उपसरपंच पदावर ग्रामपंचायतीच्या कोणत्याही सदस्याची निवड होऊ शकते. प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या ग्रामपंचायतीच्या पहिल्या सभेत उपसरपंचाची निवड केली जाते. उपसरपंचाच्या निवडणुकीत समसमान मते पडल्यास सरपंचाला निर्णायक मत देण्याचा हक्क असतो. सरपंच व उपसरपंच यांचा अवधी ग्रामपंचायतीच्या अवधी इतका असतो (5 वर्षे)


सरपंच व उपसरपंच यांचे मानधन :

| ग्रामपंचायतीची लोकसंख्या | सरपंचाचे मानधन | उपसरपंचाचे मानधन |
|---|---|---|
| 0 ते 2000 | रु. 3000 | रु. 1000 |
| 2001 ते 8000 | रु. 4000 | रु. 1500 |
| 8001 पेक्षा जास्त | रु. 5000 | रु. 2000 |

ग्रामपंचायत उत्पन्नाच्या 2% किंवा 6000 रु. यापैकी कमी रक्कम सरपंचाला आतिथ्य भत्ता म्हणून दिली जाते. रक्कम ठरविण्याचा अधिकार हा राज्य शासनाला आहे. मानधन व बैठक-भत्त्याची रक्कम ही ग्रामनिधीतून खर्च केली जाते.

राजीनामा :

सरपंच पंचायत समितीच्या सभापतीकडे आणि उपसरपंच सरपंचाकडे आपल्या पदाचा राजीनामा देता येतो. ग्रामपंचायतीच्या सभेपुढे राजीनामा मांडला जातो. ग्रामपंचायतीच्या सभेपुढे राजीनामा मांडल्यापासून 7 दिवसानंतर राजीनामा अंमलात येतो.



गावातील रस्ते वाहतूक व
दळणवळण सुविधा आणि
आनावधान पाण्याशी नोंद

Page Date

## * सरपंचाची कार्ये व अधिकार *

- ग्रामपंचायतीने संमत केलेल्या ठरावाची अंमलबजावणीचा अधिकार सरपंचाला असतो.
- सरपंच हा पंचायतीकडे सोपवलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्रत्यक्षपणे जबाबदार असतो.
- सरपंच हा ग्रामपंचायतीच्या सभेच्या अध्यक्षस्थानी असतो व तो ग्रामपंचायतीच्या सभेचे विनियमन करतो.
- तो कायद्यान्वये आवश्यक असलेली सर्व विवरणे व अहवाल तयार करण्याची तजवीज करतो.
- तो ग्रामसभेच्या सभा बोलावतो व अध्यक्षपद भूषवितो.
- तो उत्पन्नाची प्रमाणपत्रे स्वतःच्या सही व ग्रामपंचायतीच्या शिक्क्यासह देऊ शकतो.
- ग्रामपंचायतीचे बँक खाते सरपंच व ग्रामसेवक यांच्या संयुक्त नावावर असते.
- सरपंच ग्रामपंचायतीमध्ये हंगामी कर्मचारी नेमू शकतो.
- तो ग्रामपंचायतीच्या सर्व अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या कृती व कार्यवाही यावर देखरेख व नियंत्रण ठेवतो.

## * उपसरपंचाची कार्ये व अधिकार *

- सरपंचाच्या अनुपस्थितीत ग्रामपंचायतीच्या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारणे व सभेचे विनियमन करणे.
- सरपंचाने स्वतःच्या अधिकारांपैकी व कर्तव्यांपैकी उपसरपंचाकडे सोपवलेल्या अधिकारांचा वापर करणे व कर्तव्ये पार पाडणे.

## * पदावरून काढण्याबाबत विभागीय आयुक्तांचे अधिकार *

ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच यांना त्यांची कर्तव्ये बजावताना गैरवर्तन, लज्जास्पद वर्तन, कर्तव्यांकडे दुर्लक्ष / असमर्थता या कारणावरून पदावरून काढण्याचा अधिकार विभागीय आयुक्तांना आहे. त्यावेळी संबंधितांना आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाते. विभागीय आयुक्तांकडून पदावरून काढल्यास ती व्यक्ती उर्वरीत पदावधीत सरपंच / उपसरपंच पदावरून काढल्यास ती व्यक्ती उर्वरीत पदावधीत सरपंच / उपसरपंच म्हणून निवडून येण्यास पात्र नसते.

## ग्रामपंचायतीच्या सभा

दर महिन्याला ग्रामपंचायतीची किमान 1 सभा होते. सरपंच / त्यांच्या अनुपस्थितीत उपसरपंच पुढील सभेची तारीख निश्चित करतात. सरपंच व उपसरपंच दोघेही अनुपस्थित असल्यास त्यांच्यापैकी एकाची अध्यक्ष म्हणून निवड करतात. सर्वसाधारण सभेची नोटीस ग्रामपंचायतीचा सचिव सभेच्या तारखेच्या किमान 3 दिवस अगोदर प्रत्येक सभासदाला देतो. विशेष सभेच्या किमान 1 दिवस अगोदर विशेष सभेची नोटीस ग्रामपंचायतीच्या प्रत्येक सदस्याला दिली जाते. ग्रामपंचायतीच्या सभेचे कामकाज चालविण्यासाठी सरपंच व उपसरपंच सहित ग्रामपंचायतीच्या एकूण सदस्यांच्या किमान 1/2 सदस्य उपस्थित असणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतीची प्रत्येक सभा सर्वांसाठी खुली असते. अध्यक्ष आवश्यक वाटल्यास ग्रामपंचायतीची गोपनीय सभा घेऊ शकतात.

## ग्रामसभा

ग्रामसभेमध्ये गावातील सर्व प्रौढ स्त्री-पुरुष मतदारांचा समावेश होतो. प्रत्येक वित्तीय वर्षात ग्रामसभेच्या किमान 4 सभा घेणे बंधनकारक आहे. दोन सभा दरम्यान 4 महिन्यांपेक्षा जास्त अंतर नसावे. वित्तीय वर्ष सुरु झाल्यापासून 2 महिन्याच्या आत पहिली सभा घेतली पाहिजे. दुसरी सभा प्रत्येक वर्षाच्या नोव्हेंबर महिन्यात घेतली जाते. सरपंचाला स्वतःहून कोणत्याही वेळी ग्रामसभेची सभा बोलवता येईल. स्थायी समिती / पंचायत समिती / मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मागणी केल्यास, नमूद कालावधीत सरपंच ग्रामसभा बोलावतील. ग्रामसभेतील महिला सदस्यांची सभा ग्रामसभेच्या प्रत्येक नियमित सभेपूर्वी घेण्यात येईल. सरपंच त्या सभेची कार्यवृत्ते ग्रामसभेच्या नियमित सभेसमोर ठेवील. ग्रामसभा, राज्य व केंद्र शासनाच्या व्यक्तिगत लाभधारक योजनांकरिता लाभधारकांची निवड करते.

## * ग्रामपंचायत सचिव *

ग्रामपंचायतीच्या सचिवाची नेमणूक जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे करतात. ग्रामपंचायत सचिवाला जिल्हा परिषद पदनाम नेमून दिले असता ग्रामपंचायत सचिवाला 'ग्रामसेवक' म्हणतात. ग्रामपंचायतीचा सचिव हाच 'ग्रामसभेचा सचिव' असतो. ग्रामपंचायत सचिव हा 'जिल्हा सेवा (वर्ग तीन)' मधील व्यक्ती असून त्याचे वेतन 'जिल्हानिधी' मधून दिले. ग्रामसभेपुढे ठेवण्यासाठी ग्रामपंचायतीच्या विकासविषयक कार्याच्या अंदाजाचा अहवाल तयार करणे व त्याची माहिती ग्रामपंचायतीच्या सूचना फलकावर लावणे हे ग्रामपंचायत सचिवाचे कर्तव्य असते. याला कसूर केल्यास तो शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र असतो.

### * प्रशासकीय अधिकार व कार्ये *

ग्रामनिधीतून ग्रामसूचीतील विषयाबाबत आर्थिक तरतूद करणे हे कर्तव्य आहे. गावातील रहिवाशांचे आरोग्य, शिक्षण, सुरक्षितता, सुखसोयी, कल्याण याकरिता योजना/उपाययोजना करणे. SC, ST, OBC यांची स्थिती सुधारण्यासाठी आणि अस्पृश्यता निवारण याकरिता राज्य शासन, जिल्हाधिकारी त्याने प्राधिकृत केलेली व्यक्ती यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करणे. आपल्या अधिकारक्षेत्रातील प्राथमिक शाळांवर देखरेख ठेवणे. कोणत्याही कायद्यान्वये सोपवलेली कर्तव्ये पार पाडणे.

ग्रामपंचायतीतील कर्मचारी :

| ग्रामपंचायतीची लोकसंख्या | कर्मचारी |
|---|---|
| 0 ते 1000 | 1 |
| 1001 ते 3000 | 2 |
| 3001 ते 6000 | 3 |
| 6001 ते 10000 | 4 |
| 10000 पेक्षा जास्त | 5 |

## * ग्रामपंचायतीच्या कामाचे विषय *

1) कृषी
2) पशुसंवर्धन
3) वने
4) समाजकल्याण
5) शिक्षण
6) वैद्यकीय सेवा, सार्वजनिक आरोग्य
7) इमारती व दळणवळण
8) पाटबंधारे
9) उद्योग व कुटीरोद्योग
10) स्वसंरक्षण व ग्रामसंरक्षण
11) सामान्य प्रशासन

### डोंगरगाव ग्रामपंचायतीचे विविध क्षेत्रातील योगदान

**1) कृषी :**

डोंगरगावातील बहुतांशी लोक हे कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे डोंगरगाव ग्रामपंचायतीकडून कृषी क्षेत्राला समर्पक प्रोत्साहन दिले जाते. सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांकडून कृषीवर आधारित विविध माहितीपर कार्यक्रम आयोजित केले जात. कृषी विषयक उत्पन्नाची निवड कशी करावी व योग्य उत्पादनाची पद्धती, रासायनिक खते यांचा योग्य वापर व कमी पाण्यात अधिक उत्पन्न कसे घ्यावे याबाबत कार्यक्रमांमध्ये मार्गदर्शन दिले जाते. पीक विमा, अल्पव्याजी कृषी कर्ज, सहकारी संस्थाकडून मिळणारी अल्प मुदतीची कर्जे यासाठी लागणारा नमुना नंबर 8 ग्रामपंचायतीकडून दिला जातो.

**2) पशुसंवर्धन :**

गावातील काही लहान व मोठ्या प्रमाणात वयोवृद्ध नागरिक पशुसंवर्धनात गुंतून आहेत. त्यावर त्यांचा चरितार्थ चालतो. ग्रामपंचायतीकडून गावामध्ये मोफत प्राणी तपासणी शिबीर भरवून प्राण्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जाते. तसेच अधिकाधिक पशुसंवर्धन करावे यासाठी पाठपुरावा ग्रामपंचायत करते.

वने:

गावाजवळील डोंगरावर दरवर्षी पावसाळ्यामध्ये ग्रामपंचायत व जिल्हापरिषद शाळा व आदर्श विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण केले जाते. व त्यांना पाणी देण्याचे व निगा राखण्याचे काम विद्यार्थी करतात.

शिक्षण:


जिल्हापरिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी शिक्षण साहित्य, खेळाचे साहित्य, आवश्यक वस्तू इ. ग्रामपंचायतकडून पुरविल्या जातात. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे यासाठी गावकरी मुलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करतात. विद्यार्थ्यांसाठी गावात अभ्यासिका व ग्रंथालय व्हावे यासाठी ग्रामपंचायत प्रयत्न करत आहे.

वैद्यकीय सेवा:

गावातील गरोदर स्त्रिया व लहान मुलांचे आरोग्य सुस्थितीत रहावे यासाठी आरोग्याधिकारी यांच्याकडून तपासण्या होत असतात. गावातील गरोदर स्त्रियांना आहार पुरवला जातो. लहान मुलांना ~~डोस~~ 'पोलिओ' डोस देण्यासाठी ग्रामपंचायतमध्ये शिबीर आयोजित केले जाते.

दळणवळण:

गावातील रस्ते हे डांबरी/पक्के असून त्यांची ग्रामपंचायती कडून देखभाल केली जाते. गावातील रस्ते साफसफाई चे काम गावकरी स्वतः हून करतात. जालना ते डोंगरगाव रस्त्याच्या निर्मितीसाठी गावातील नागरीक व ग्रामपंचायत पाठपुरावा करत असतात.



ऐतिहासिक मारुती मंदिर

स्वच्छता :

गावामध्ये जागोजागी कचरा साठविण्यासाठी, ओला कचरा व सुखा कचरा वेगळा ठेवण्यासाठी कुंड्या ठेवल्या आहेत. गावातील प्रत्येक व्यक्तीकडे स्वतःचे शौचालय आहे. गावाला हागणदारी मुक्त गाव हा पुरस्कारही मिळाला आहे.

अशाप्रकारे डोंगरगाव ग्रामपंचायतीचे योगदान हे गावाच्या विकासावर दिसून येते. गावातील ग्रामपंचायत ही समन्वयपणाने व सर्वांच्या संमतीने काम करते. गावातील निवडणुका ही शांततामय व आदरात सर्वां बिनविरोध पार पडतात. गावामध्ये राजकीय पक्ष नसून राष्ट्रीय नेत्यांमुळे राजकारणापेक्षा लोक समाजकारणाला समर्थन दर्शवितात. गावातील भांडण-तंटे गावातच सोडवले जातात. पोलीस पाटील गावातील कृत्यांची माहिती पोलीस स्टेशनला देतात. त्यामुळे गावामध्ये जाती-जमातीमध्ये सौहार्दपूर्ण व सुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. गावातील ग्रामपंचायत ही आगामी काळात सरकारी संस्थेचा उपक्रम राबवणार आहे.